# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

ज्ञानगंगा घरोघरी

## नियोजन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 43 |
| स्थळ | : | **प्रशासकीय इमारत सभागृह,<br>य.च.म,मुक्त विद्यापीठ, नाशिक** |
| दिनांक | : | **गुरूवार, 16 फेब्रुवारी 2023** |
| वेळ | : | **दुपारी 4 वाजता** |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

---

## कार्यवृत्त

43 वी नियोजन मंडळ बैठक, गुरूवार, दिनांक 16 फेब्रुवारी 2022 रोजी सकाळी 4.00 वाजता, विद्यापीठातील सभागृहात **ऑनलाईन व ऑफलाईन** आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा. डॉ. पी.जी. पाटील, कुलगुरू — अध्यक्ष
2. डॉ. जयदीप निकम — सदस्य
3. डॉ.राम ठाकर — सदस्य
4. डॉ. मनोहर पाटील — सदस्य
5. डॉ. संजय बी. चोरडिया — सदस्य (ऑनलाईन)
6. डॉ. अरविंद चौधरी — सदस्य (ऑनलाईन
7. मा.भटूप्रसाद पाटील, कुलसचिव (प्र.) — सदस्य सचिव

**खालील सदस्याची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

8. मा.आ. श्री.सुहास कांदे — सदस्य

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 43.1.0 | | **स्वागत**<br>मा.कुलसचिवांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. तसेच नियोजन मंडळावर मा.कुलगुरू यांनी नियुक्त केलेले नवनियुक्त सदस्य सन्माननीय डॉ.जयदीप निकम, डॉ.राम ठाकर, डॉ.प्राचार्य मनोहर पाटील आणि मा.राज्यपाल नियुक्त सदस्य प्राचार्य डॉ.अरविंद चौधरी यांचे मा.कुलगुरू यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर बैठकीस सुरवात करण्यात आली.<br><br>सभेच्या सुरूवातीला मा.कुलगुरूंनी नियोजन मंडळाची बैठक एक वर्षांनी होत आहे. हे काही योग्य नाही. नियोजन मंडळाची बैठक नियोजित वेळेत वर्षातून दोनवेळा होण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्यात यावी असे मा.कुलगुरू यांनी सूचित केले.<br><br>तसेच ऑगस्ट 2021 नंतर पहिली बैठक संपन्न होत आहे. नियोजन मंडळाच्या वर्षातून दोन बैठका होणे अपेक्षित असतांना 2022 मध्ये पूर्ण वर्षभरात बैठकीचे आयोजन करण्यात आले नाही. यापुढे विहित वेळेत बैठकाचे वेळापत्रका प्रमाणे आयोजन काटेकोरपणे पार पाडावे. यापुढे बैठकीचे नियोजन वेळेत आणि सहपत्रांसह कार्यक्रम पत्रिका (अजेंडा) पाठविण्यात येतील असे सभागृहाला अवगत करण्यात आले. |
| 43.2.0 | 43.2.1 | दि. 4 ऑगस्ट 2021 रोजी झालेल्या 42 व्या नियोजन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.<br><br>**नियोजन मंडळ ठराव:** दि. 4 ऑगस्ट् 2021 रोजी झालेल्या 42 व्या नियोजन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते कायम करण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| 43.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 43.3.1 | सन 2022-23 यावर्षी राबविण्यात आलेले शिक्षणक्रम त्याअनुषंगाने सर्व विद्याशाखेने कार्यवाही केलेली आहे.<br>**नियोजन मंडळ ठराव** : सन 2022-23 यावर्षी राबविण्यात आलेले शिक्षणक्रम त्याअनुषंगाने सर्व विद्याशाखेने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
| | 43.3.2<br>सर्व<br>विद्याशाखा | सन 2023-24 यावर्षी नव्याने सुरु करावयाचे शिक्षणक्रम व अध्ययन साहित्य, समंत्रण, मूल्यमापन इत्यादी संदर्भात वार्षिक नियोजन **(सहपत्र B)**<br>1. मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा<br>2. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा<br>3. शिक्षणशास्त्र विद्याशाखा<br>4. कृषी विज्ञान विद्याशाखा<br>5. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा<br>6. संगणकशास्त्र् विद्याशाखा<br>7. आरोग्य विज्ञान विद्याशाखा<br>8. निरंतर शिक्षण विद्याशाखा<br>**नियोजन मंडळ ठराव** : सन 2023-24 या शैक्षणिक वर्षापासून नव्याने सुरु करावयाचे शिक्षणक्रम व अध्ययन साहित्य, समंत्रण, मूल्यमापन इत्यादी संदर्भात सर्व विद्याशाखांनी सादर केलेल्या वार्षिक नियोजनाची नोंद घेण्यात आली असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 43.3.3<br>**विद्यापीठ संशोधन समिती** | पीएच.डी. **PET Exam** -2023 आयोजनाबाबत..... (सहपत्र C)<br>(टिपणी – युजीसीच्या **Regulation** नुसार मुद्दा क्र. 4 च्या 4.1 मध्ये **All Universities shall admit Ph.D. Scholars through a National Eligibility Test (NET) or National Entrance Test or an Entrance test conducted at the level of individual universities** असे नमूद केलेले असल्याने पीएच.डी. **PET Exam** -2023 आयोजनाबाबतचा विषय नियोजन मंडळापुढे विचारार्थ सादर... )<br><br>नियोजन मंडळ ठराव : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या मार्गदर्शक तत्वानुसार विद्यापीठाने पीएच.डी. (**Ph.D. PET Exam 2023**) पेट परीक्षा 2023 या शैक्षणिक वर्षात युजीसी मान्यतेनंतर आयोजन करण्यास मान्यता देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. |
| | 43.3.4<br>**विद्यार्थी सेवा विभाग** | **नव्याने अभ्यासकेंद्र द्यावयाच्या धोरणाबाबत व प्रवेश प्रक्रियेबाबत.... (सहपत्र D)**<br>1) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. 4 सप्टेंबर 2020 च्या The Gazzette of India नुसार, दि. 23 ऑगस्ट 2022 च्या Centre for Internal Quality Assurance (CIQA) च्या पत्रानुसार शैक्षणिक वर्ष 2023-24 साठी पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाचे अभ्यासकेद्र हे उच्च शैक्षणिक संस्थेमध्येच सुरु करावे लागतील असे निर्देश आहे.<br>2) शैक्षणिक वर्ष 2023-24साठीची प्रवेश प्रक्रियांचे टप्पे निश्चित करणे.<br><br>3) मा.कुलगुरुंनी निर्देशित केल्यानुसार ज्या शिक्षणक्रमांची पुस्तके विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सॉफ्ट कॉपी /PDF/E-book स्वरुपात ऑनलाईन किंवा छपाई स्वरुपात उपलब्ध असतील अशाच पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु करणे.<br><br>4) शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये UGC च्या निर्देशानुसार उच्च शिक्षण संस्था नसलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात कार्यान्वित असलेल्या अभ्यासकेंद्रावर प्रथम वर्षाचे प्रवेश स्थगित करण्यात आले आहेत. यासदर्भात मा. कुलगुरु कार्यालयाकडून UGCकडे पाठपुरावा करण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | आलेला होता मात्र याबाबत कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नसल्याने अशा कनिष्ठ महाविद्यालयात असलेल्या अभ्यासकेंद्रावरील शैक्षणिक वर्ष 2023-24साठी द्वितीय वर्षाचे प्रवेश स्थगित करणे.<br>वरील 1 ते 4 संदर्भात विद्यार्थी सेवा विभाग यांनी सादर केलेला प्रस्ताव मा. नियोजन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर...<br>**नियोजन मंडळ ठराव** : संचालक विद्यार्थी सेवा विभाग तसेच सेंटर फॉर इंटरनल क्वॉलिटी एशोरन्स (CIQA) या विभागाकडून प्राप्त झालेल्या वरील 1 ते 4 प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. तसेच या कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश नैसर्गिक पध्दतीने टप्प्याटप्याने प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाचे प्रवेश बंद करण्यास देखील सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 43.3.5<br>**शिक्षणशास्त्र विद्याशाखा** | **सर्व विद्याशाखातील पदवी शिक्षणक्रमांना EDU-271 "यशवंतराव चव्हाण जीवन व कार्यपरिचय" हा अभ्यासक्रम क्रेडीट कोर्स म्हणून समावेश करणेबाबत..** **(सहपत्र E)**<br>**(टिपणी** – प्रस्तुत विद्यापीठ मा.यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने स्थापन झालेले असल्याने विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांना परिचय व्हावा या दृष्टीने विद्यापीठाच्या सर्व पदवी शिक्षणक्रमांच्या अध्ययनार्थीसाठी हा अभअयासक्रम क्रेडीट कोर्स म्हणून कार्यान्वित करणेबाबतचा विषय नियोजन मंडळापुढे विचारार्थ सादर...<br><br>**नियोजन मंडळ ठराव** : शिक्षणशास्त्र विद्याशाखेने सादर केलेला प्रस्ताव खुप चांगला आहे. मा.यशवंतराव चव्हाण यांचे नावाने विद्यापीठ सुरू असून "यशवंतराव चव्हाण जीवन व कार्यपरिचय" हा अभ्यासक्रम क्रेडीट कोर्स म्हणून समावेश करावयास हवा होता असे प्राचार्य डॉ.अरविंद चौधरी यांनी सांगितले. तथापि शिक्षणशास्त्र विद्याशाखेने "यशवंतराव चव्हाण जीवन व कार्यपरिचय" **(EDU271)** हा क्रेडीट कोर्स विकसित केला आहे. (4 श्रेयांक – 4 **Credit Points)** सर्व विद्याशाखेतील पदवी शिक्षणक्रमांना (**Regional Case Studies** च्या अंतर्गत) वैकल्पिक (Optional) म्हणून अध्ययन साहित्य विद्यापीठाच्या फॉरमॅटमध्ये झाल्यावरच लागू करण्यात यावा यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 43.4.0 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचे विषय** |
| | 43.4.1 | **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे आटपाडी, जि. सांगली येथे विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव नियोजन मंडळाच्या बैठकीत विचारार्थ सादर...**<br>**(टिपणी**- महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य मा.श्री.गोपीचंद पडळकर यांनी आटपाडी जि.सांगली येथे विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्यासंदर्भात संचालक, विद्यार्थे सेवा विभाग यांनी सादर केलेला प्रस्ताव नियोजन मंडळाच्या दिनांक 16.02.2023 च्या बैठकीस मा.अध्यक्षांनी ऐनवेळी सादर करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने सदरचा विषय नियोजन मंडळापुढे चर्चेसाठी ठेवण्यात आला. सदरच्या विषयावर सर्व सदस्यांसमवेत चर्चा झाल्यानंतर विषय नियोजन मंडळाने शिफारस करून व्यवस्थापन मंडळापुढे सादर करावा असे सुचविले)<br><br>**नियोजन मंडळाचा ठराव** : विद्यार्थी सेवा विभागाने आटपाडी, जि. सांगली येथे विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे. तसेच नियोजन मंडळाने केलेली शिफारस व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यास मान्यता देण्यात आली. |

मा.कुलगुरू तथा अध्यक्ष नियोजन मंडळ यांच्या परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सदस्य सचिव**
नियोजन मंडळ

**अध्यक्ष**
नियोजन मंडळ